| MHSO200004492013 | **नियमित दिवाणी दावा क्र. १३०/२०१३** |
| --- | --- |

## निशाण क्र. ९० खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयतप्रतिवादी क्र. ५ सखुबाई श्रीपती फुले यांचेबाबत पारीत झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादीचे कथन असे आहे की, सदर दाव्याचे काम चालू असताना यातील प्रतिवादी क्र. ५ सखुबाई श्रीपती फुले हया दि. २८/११/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. सदर प्रतिवादी क्र. ५ यांच्या मयताचा दाखला व त्यानंतर मयताचे वारसांची माहिती वेळेत मिळालेली नसल्यामूळे त्यांचेविरुध्द दावा अबेट झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतीचा असल्याने दावा अबेटचा हुकूम रद्द होणे न्यायाचे व जरुरीचे आहे. सबब, प्रतिवादी क्र. ५ यांच्याविरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून मिळावा अशी वादीने विनंती केलेली आहे.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादींतर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज कायदेशीर नसल्यामूळे सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. यदाकदाचित सदरचा अर्ज मंजूर करण्याचा झाल्यास वादीवर जास्तीत जास्त कॉस्ट बसविण्यात यावी.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रतिवादींविरुध्द सदरचा दावा जाहीरीकरणासाठी, वाटपासाठी व पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जात वादीने सदर मयत प्रतिवादी क्र. ५ यांचा मृत्यू दाखला व त्यानंतर मयताचे वारसांची माहिती वेळेत मिळालेली नाही असे कारण नमूद केले आहे. सदर कथनाच्या पृष्टयार्थ नि.क्र. ९०

वर वादीने शपथपत्र दाखल केलेले आहे. अभिलेखावर दाखल नि.क्र. ८९/१ वर दाखल असलेल्या मृत्यूदाखल्यावरुन मयत प्रतिवादी क्र. ५ सखुबाई श्रीपती फुले हया दि. २८/११/२०२३ रोजी मयत झाल्याचे निदर्शनास येते. सदर दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषावर निर्गत होणे आवश्यक आहे. तसेच, सदर दाव्याचा संपूर्णपणे व कायम स्वरुपी न्यायनिर्णय होणेकामी प्रतिवादी क्र. ५ च्या वारसांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यासाठी, प्रतिवादी क्र. ५ चे विरुध्द झालेला अबेटमेंन्ट आदेश रद्द करणे आवश्यक आहे. वादींनी प्रतिवादी क्र. ५ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होण्यासाठी नि.क्र. ९२ वर अर्ज दाखल केला असून सदरचा अर्ज या न्यायालयाने आजरोजी मंजूर केला आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे,

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने नि.क्र. ९२ वरील आदेशाची पुर्तता करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने नि.क्र. ९२ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र. ५ चे विरुध्द झालेला अबेटमेंन्ट आदेश रद्द करण्यात येतो.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.03.11 17:12:04 +0530

**(एस. एस. साळुंखे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

दिनांक – ११/०३/२०२६

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ११/०३/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | ११/०३/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १२/०३/२०२६ |